MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात




बीड: बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी र्गावरील अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या भालचंद्र माध्यमिक विद्यालयासमोर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर व ग्रामस्थांनी आक्रमक होत भालचंद्र विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. याच राज्य मार्गावर येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून एचपीएम कंपनीने गतिरोधक बसवलेले असताना मांजरसुंभा ते चुंभळीफाटा मार्गाचे कंत्राटदार असणारी एचसीपीएल कंपनीने त्याच धर्तीवर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. तहसीलदार चंद्रकांत शेळके , अशोक ससाणे उप अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असुन लवकरात लवकर गतिरोधक बसविण्यात येतील या आश्वासनानंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी अशोक डरपे, एचसीपीएल कंपनीचे प्रतिनिधी दादा बांगर,नेकनुर पोलिस स्टेशनचे ढाकणे ,लिंबागणेश पोलिस चौकीचे पोहे. बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंडे, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे, सहशिक्षक मूकुंद मोटे, गणेश आजबे, सचिन. वाणी ,

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१०९ | शनिवार दि.०४ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -109 | SATURDAY DT.04 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# वेलडन एसपी नवनीत कॉवत साहेब बीड करांचे मन जिंकले









## न्यायासाठी झटणारे लोकप्रतिनिधींच्या हाकेला अन् जनतेच्या भावनेला यशस्वी साद

- बीड जिल्ह्याच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात नवनीत कॉवताचे नाव लिहिले जाणार
- बीड जिल्ह्यातील अनेक दिग्गज पोलीस अधिकाऱ्यांनी नवनीत कॉवत साहेब यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून काम करावे.
- संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे अटक
- बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि माफिया नवनीत कावंत यांच्या दहशतीने लपले.
- माफिया आणि गुंडाराज संपविण्यात नवनीत कॉवत नाव मोठच.
- आरोपींची संख्या सहावर एक आरोपी फारारच.
- सर्व आरोपी पुण्याहूनच अटक का विरोधकांच्या टीकेचा जोर वाढला.!
- संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना फरार होण्यासाठी मदत करणाऱ्या डॉ वायबसेलाही घेतलं पोलिसांनी ताब्यात.
- धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा - आ. संदीप क्षीरसागर
- सुदर्शन घुले एक प्यादा : आ. सुरेश आण्णा धस.

फरार आरोपींना अटक झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना आ. सुरेश धस म्हणाले, यातला एक आरोपी अद्याप फरार आहे, त्याचं नाव कृष्णा आंधळे तो पोरगा राहिला आहे आणि सुदर्शन घुले हा मुख्य आरोपी नाही तो प्यादा आहे. त्याच्या पाठीमागचा मुख्य आरोपी हा कोण आहे, तो शोध पोलिसांनी घेतला पाहिजे. यातला मुख्य आरोपी हा आका आहे. मी ज्यांचा उल्लेख आका असा करतो ते आकाच मुख्य आरोपी आहे. बाकीचे प्यादे आहेत, त्यांना सांगितलं जावा असं करा तसं करा असं ते आहे, मुख्य आरोपी हा आका आहे. मुख्य आरोपी सुदर्शन घुले आहे, असं म्हणूनच नका. सुदर्शन घुले हा फक्त अंमलबजावणी करणारा आहे. परंतु हे जे आदेश दिलेले आहेत, खंडणीसाठी त्या कंपनीच्या साहेबांना उचलून आणा, तो हा प्रकरणाचा मुख्य आरोपी आहे असं माझं मत असल्याचे आ. सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

अपहरणापूर्वी आरोपींना सरपंच संतोष देशमुख यांचे लोकेशन देणारा सिद्धार्थ सोनवणे ला केले जेरबंद.

बीड - मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे







अपहरण करण्यासाठी त्यांचं लोकेशन देणारा मस्साजोग येथीलच सिद्धार्थ सोनवणे याच्या स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी काल कल्याण (मुंबई) येथून एका उसाच्या गाडीवर काम करत असताना मुसक्या आवळल्या आहेत. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा आता पूर्णपणे उलगडा होण्यास मदत होणार आहे.


केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेने जिल्ह्यासह राज्याला हादरवून सोडले होते.या हत्या प्रकरणातील फरार प्रमुख आरोपी सुदर्शन घुले व सुधीर सांगळे या दोघांनाही बीडच्या पोलिसांनी शुक्रवारी रात्री पुण्यातून ताब्यात घेतले आहे. तर या आरोपींना सरपंचाचे अपहरण करण्यापूर्वी लोकेशन देणारा मस्साजोग गावातीलच सिद्धार्थ सोनवणे याला देखील मुंबईतून बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. यापूर्वीच जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले यांना अटक केली आहे. तर तर पुरवणी जबाब आवरून विष्णू चाटे यांना देखील अटक करण्यात आलेली होती. सध्या या प्रकरणात कृष्णा आंधळे हा फरार आहे.


दरम्यान संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर सिद्धार्थ सोनवणे हा गावातच होता. मयत देशमुख यांच्या अंत्यविधीला देखील तो उपस्थित होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस सुरुवातीला आरोपींचा तपास करत असताना त्यांनी आपले लक्ष गावातच केंद्रित केलेले होते. अपहरण करण्यापूर्वी कोणीतरी जवळचा व्यक्ती लोकेशन देत असावा असा संशय पोलिसांना होता. लोकेशन देणाऱ्यांचा पोलीस शोध घेत असल्याची कुणकूण सिद्धार्थ सोनवणे याला लागली होती. घटनेच्या दोन दिवसानंतर तो देखील गावातून फरार झाला.सिद्धार्थ सोनवणे फरार झाल्यानंतर त्याच्या संदर्भातील गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळवण्यास सुरुवात केली. त्यानंतर सिद्धार्थ हा देखील या गुन्ह्यात सहभागी असल्याची खात्री स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना पटली. त्यानंतर १५ दिवसांपासून त्याचा शोध सुरू होता.सिद्धार्थ सोनवणे हा फरार झाल्यानंतर मुंबईत लपून बसला होता. त्याने या काळात वेगवेगळी पाच सिम कार्ड देखील वापरली होती. स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना त्याचे मुंबईतील लोकेशन मिळताच त्या ठिकाणी त्यांनी सापळा लावला. एका मोकळ्या पटांगणात उसाच्या गाड्यावर काम करत असतानाच पोलिसांनी त्याच्यावर झडप मारली.दरम्यान ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महेश विघ्ने, तुळशीराम जगताप, विकास वाघमारे, भागवत शेलार, गणेश मराडे, विक्की सुरवसे यांनी केली.

# गेवराई पंचायत समितीत घरकुल घोटाळासह अनेक विभागात कोट्यावधी रुपयाचा वाचा पुढील अंकात?

## तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत नरेगा च मोठा घोटाळा उघडकीस येणार







## केंद्राच्या समित्या आल्या आणि मॅनेज होऊन गेल्या ?

तलवाडा प्रतिनिधी (सुमेध करडे)

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत स्तरावरील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या पांदन रस्ता, शेततळे, गायगोठा, मोहगनी वृक्ष लागवड,पेव्हर ब्लॉक,सिमेंट कॉंक्रिट रस्ते,जलसिंचन विहीर,यासारख्या अनेक कामात लाखोंचा भ्रष्टाचार करत शासनाची फसवणूक करण्यात आली आहे,या बाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या परंतु त्या आर्थिक तडजोडी करून मिटविण्यात अधिकारी,कर्मचारी ,सरपंच,ग्रामसेवक, रोजगार सेवक यांना यश आले आहे.आणि यामुळेच यांची बोगस कामे करण्याची धमक वाढत चाल ली असून कामे न करताच कामावर मजूर दाखवून त्यांच्या नावे थातुर मतुर मस्तर काढायचे आणि अधिकारी कर्मचारी यांना हाताशी धरून कुशल बील काढण्याचे प्रकार झाले असून या सर्व प्रकारची सखोल चौकशी करून दोषी विरुद्ध कार्यवाही करण्यात यावी यासाठी ग्रामपंचायत चे सत्ताधारी पदसिद्ध उपसरपंच शेख आक्रम सौदागर यांनी पुढाकार घेवून कार्यवाही करण्याची मागणी केली आहे...

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजने मध्यील मोहगणी या योजनेचा बोगस लाभ दोन मयत व्यक्तींना देण्यात आला एख मयत नामे आठवले चेलांजी जानोजी व दुसरे मयत नामे राधाकिसन धोंडीबा भुसारे हे आहेत. जे की पहिले मयतव्यक्ती आठवले चेलांजी जानोजी यांचा मृत्यु दि ६/११/२०२० रोजी व दुसरे मयत नामे राधाकिसन धोंडीबा भुसारे यांचा मृत्यु दि ३०/०९/२०२० असा आहे.यांच्या नावे मोहगणी वृक्षलागवड योजनेचे२८/०६/२०२२ पासून ते २०/०४/२०२४ पर्यंत अनुदान उचलले आहे यामध्ये मयतनामे आठवले चेलांजी हे ग्राम रोजगार सेवक रमेश भास्कर आठवले यांचे नात्याने आजोबा आहेत यांनी मयतव्यक्तीच्या नावे शासनाच्या योजनांचा लाभ घेवून मयत लाभार्थी च्या नावे पैसे उचलुन शासनाची फसवणूक .करून पैसे काढण्यात आले आहेत.त्याच बरोबर मोहगणी नलावता ग्रामपंचायत सदस्य पती गणेश बाबुराव कचरे यांच्या नावे ही लाभ देण्यात आला असून या सर्व प्रकरणाची चौकशी करून या मध्ये दोषी अधिकारी,कर्मचारी,अभियंता, ग्रामसेवक,आणि रोजगार सेवक यांच्यावर कार्यवाही करावी अशी मागणी शेख आक्रम जैनिद्दिन सौदागर,उपसरपंच ग्रामपंचायत तलवाडा तथातालुकाध्यक्ष ग्राम संवाद सरपंच सघ ,गेवराई यांनी केली आहे.या अगोदर ही अनेक तक्रारी या कामाबाबत झाल्या त्यावर केंद्राची समिती जिल्ह्यात दाखल झाली होती त्यावेळी त्यांना आर्थिक तडजोड करून प्रत्यक्ष तलवाडा गावत येण्यापासून रोखण्यात आले होते अशी चर्चा देखील आहे.त्यामुळे या योजनेत बोगस कामांना बळकटी मिळत असल्याचे बोल ले जात आहे.तलवाडा ग्रामपंचायत ही मागील चार वर्षापासून बोगस कामे आणि विवध कामावरून नेहमीच चर्चेत राहिली आहे.याकडे गटविकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डोळेझाक केली असल्याने यामुळे बोगस आणि भ्रष्ट कामांना प्रोत्साहन मिळत असल्याची देखील चवीने चर्चा होते.त्यामुळे उपसरपंच आक्रम सौदागर यांनी विभागीय आयुक्त अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करून नरेगा योजनेच्या कमतील बोगस कामे कर्णावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.



# अंबाजोगाई येथील इस्तेमाच्या समारोप दुवा प्रसंगी धनंजय मुंडेंची उपस्थिती

## मुस्लिम बांधवांशी संवाद साधत दिल्या शुभेच्छा

अंबाजोगाई (प्रतिनिधी) - अंबाजोगाई येथे मुस्लिम समाजाच्या इस्तेमाच्या समारोपाच्या दुवाप्रसंगी आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी उपस्थिती लावली.

यावेळी धनंजय मुंडे यांनी समारोपाच्या दुवाप्रसंगी उपस्थित मुस्लिम समाज बांधवांशी तसेच विविध धर्मगुरूंशी संवाद साधत इस्तेमाच्या समारोप प्रसंगाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे



पदाधिकारी व मुस्लिम समाजबांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे यांचे केले सांत्वनदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अंबाजोगाई चे तालुकाध्यक्ष



राजेभाऊ औताडे यांच्या वडिलांचे नुकतेच दुःखद निधन झाले असून धनंजय मुंडे यांनी सेलू आंबा येथील राजाभाऊ अवताडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन औताडे कुटुंबीयांचे संतन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, शिवाजीराव शिरसाट, विलास बापू मोरे, विलास काका सोनवणे, अजित गरड, रणजित लोमटे, तानाजी देशमुख, गणेश देशमुख, राजाभाऊ पौळ, प्रवीण जगताप, बंडू शिंदे, शरद शिंदे, रामलिंग चव्हाण, लिंब्राज धुमाळ, धर्मराज पाटील, विठ्ठल कोकरे यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.




## भगवान महाविद्यालयात लेखक -विद्यार्थी वाचन संवाद

कडा (प्रतिनिधी) शुक्रवार दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता आष्टी येथील भगवान महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाअंर्तगत लेखक व विद्यार्थी वाचन संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ प्रमुख पाहुणे डॉ. ज्ञानेश्वर वैद्य तर लेखक व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अप्पासाहेब टाळके हे होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी अगदी भरभरून प्रतिसाद दिला. लेखक उपप्राचार्य डॉ. टाळके यानीही त्यांच्या सर्व प्रश्नांचे समाधान केले. पुस्तक वाचनाचे महत्त्व, ते कसे वाचावे? कोणती पुस्तके वाचावीत ? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.दत्तात्रय वाघ यावेळी म्हणाले विद्यार्थ्यांनी मोबाइलपासुन दूर रहावे. मोबाइलपासुन दूर राहिल्यास वाचनाची आवड निश्चित मनात निर्माण होईल. त्यासाठी पालकाची भूमिकाही महत्त्वाची आहे. त्यांनाही कठोर निर्णय घेऊन मुलांचे लाड कमी करावे लागतील. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री नंदकिशोर धोंडे, श्री काकासाहेब सोले आणि ग्रंथालय सहाय्यक श्री पांडुरंग साबळे यानी परिश्रम घेतले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत विविध उपक्रम संपन्न

## श्रीनिवास सार्वजनिक वाचनालयात वाचनसंस्कृती साठी राबवतात विविध उपक्रम

शिरूर /प्रतिनिधी

वाचन संस्कृती वाढवून मराठी भाषेला अभिजात दर्जा सिद्ध करण्यासाठी महाराष्ट शासनाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमात श्रीनिवास सार्वजनिक वाचनालय हिवरसिंगा येथे ज्ञानाई सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीचे औचित्या साधून ग्रंथप्रदर्शन,वाचन वाढवा अभियान,संवाद कौशल्य,कथन कौशल्य असे विविध उपक्रम संपन्न झाले.यामध्ये जि.प.के.प्रा.शाळा मधील इ.१ ते ७ पर्यंत व मानुरकर महाराज माध्यमिक विद्यालयातील इ.८ ते १० मधील विद्यार्थांनी सहभाग घेतला.या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जेष्ठ शिक्षक व्ही.के.मिसाळ सर, श्रीम.मेहेत्रे मॅडम,मयुर शिंदे सर,शिवनारायण दुधाळ,श्रीनिवास राऊत होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवराम राऊत



हे होते.मान्यवरांच्या उपस्थितीत सावित्रीबाईंच्या प्रतिमापुजन व अभिवादन करून ग्रंथालयातील विविध ग्रंथाचे प्रदर्शन करुन साहित्याची ओळख करून देण्यात आली.तसेच नियमित वाचन वाढवून या अभियानात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन नियमित विविध साहित्याचे वाचन करून वैचारिक समृद्धी वाढवली पाहीजे त्यासाठी श्रीनिवास सार्वजनिक वाचनालय कार्य करत आहे.संवाद कौशल्य,व कथन स्पर्धा असे विविध उपक्रम संपन्न झाले.यामध्ये प्रथम,व्दीतीय,तृतीय,उत्तेजनार्थ क्रमांक मिळवणा-या विद्यार्थानां प्रमाणपत्र व बक्षिस वितरण करण्यात आले.यामध्ये आरती शिंदे,साक्षी देवकर,सोफियान शेख,सोहम सानप,अनन्या जाधव,विशाल दुधाळ,श्रेयस देवकर,उत्कर्ष शिंदे,संचिता शिंदे,धनराज राऊत,सिद्धांत दुधाळ,प्रिन्स बडे,श्रेयस सानप सह अनेक विद्यार्थांना प्रोत्साहन पर बक्षिस वितरण करण्यात आले.यावेळी विद्यालयातील विद्यार्थी, पालक,शिक्षकवृंद ,पदाधिकारी, वाचक यांची उपस्थिती होती.यावेळी या उपक्रमासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्व वाचक,विद्यार्थी,मुख्याध्यापक, यांचे आभार शिवराम राऊत यांनी

# पिंपळनेर येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी



पिंपळनेर / प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष प्रा.सुरेश सावंत तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य राम कांबळे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बालिका दिनानिमित्त अनेक चिमुकल्या विद्यार्थीनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम.के.वाटूरे यांनी केले, तर त्यांच्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर भाषणे केली. यावेळी शिक्षक खरात, गणेश नागरगोजे, अंकिता डोरले यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.सावंत यांनी महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा गुणगौरव करून आजच्या पिढीने त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रध्दा नागेश तर आभार दत्ता तोगे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमासाठी राम घुमरे, जगदीश नागेश, अमोल ठोकरे, गणेश मुंडे, शेख लजिना सह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांची दमछाक

## कांदा रोप व मजुरांची समस्या , मजुरीवर जास्त खर्च

आष्टी/प्रतिनिधी

तालुक्यातील उंदरखेल ,हिवरा , पिंपरखेड,दौलावडगाव , घाटा पिंपरी व परिसरातील गावांमध्ये कांदा लागवड वेगात सुरू आहे मात्र लागवडीसाठी वीज, पाणी, कांदा रोप ,व महिला मजुरी या सर्वांची सांगड घालताना शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते त्यामुळे शेतकऱ्यांची चांगली दमछाक होताना दिसते सध्या कांदा लागवडीसाठी ओल्यात ( पाण्यात )कांदा लागवड करायची असेल तर दहा हजार रुपये एकर व कोरड्यात कांदा लागवड करायची असेल तर बारा हजार रुपये एकरी प्रमाणे मजुरांना पैसे द्यावे लागतात त्यामुळे यावर्षी उत्पादनाचा खर्च वाढणार आहे पहिल्या टप्प्यात परतीच्या पावसाने काही भागात कांदा रोपे वाया गेली आहेत मात्र दुसऱ्या टप्प्यात असलेली मागास कांदा रोपे उपलब्ध होणार आहेत परतीच्या पावसामुळे काही भागात कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी पहिल्याच टप्प्यात टाकलेली कांदा रोप परतीच्या पावसाने वाया गेले आहेत लागवडीसाठी तुटवडा निर्माण झाला होता सध्या कांदा रोपाला चांगला भाव आहे मात्र कित्येक शेतकऱ्यांचे पुन्हा कांदा रोपे टाकले आता कांदा रोप मोठ्या प्रमाणात उपलब्ध असले की दिसते यंदा कांदा



लागवडीसाठी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे महिला मजूर पाणी वीज कांदा रोपे या सर्वांची एकत्र सांगड घालून कांदा लागवड करताना शेतकऱ्यांची दमछाक झाल्याचे दिसून येते त्यातच वाढते मजुरी बदलते हवामान खते व औषधाच्या वाढत्या किमती विजेचे लपंडाव यामुळे कांद्याचे उत्पन्नाचा खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे

# ऑनलाइन फसवणूक झालेल्यांची रक्कम साहेबराव पोलिसांनी परत मिळवून दिली

बीड /प्रतिनिधी - ऑनलाइन फसलोकीचा प्रकार बीड जिल्ह्यामध्ये व महाराष्ट्र देशामध्ये मोठ्या प्रमाणात होत असताना मात्र बीड जिल्हा सायबर क्राईम ब्रँच अनेकांचे ऑनलाईन फसवणूक मधून तक्रार नोंदवून गेलेली फसवणुकीचे रक्कम तक्रारदारांना मिळवून देण्यात यश आले आहे त्यामुळे पोलीस सायबर क्राईम ब्रँच जनतेतून कौतुक होत आहे यावेळी सायबर क्राईम ब्रँच यांनी आजपर्यंत फसवणूक झालेल्या व्यक्तींची खात्यामधून गेलेली रक्कम ही पुन्हा त्यांच्या खात्यामध्ये जमा करून दिली आहे ती खालील प्रमाणे आहे



१) ऑनलाईन लिंक वरुन तक्रारदार यांची ७०,०००/- रु. फसवणूक झालेली रक्कम सायवर पोलीस स्टेशन, बीड यांनी तांत्रीक पध्दतीने तपास करून परत मिळवली २) विला बुकींग करणेसाठी तक्रारदार यांची ६२,०००/- रु. ची ऑनलाईनद्वारे फसवणुक झालेली रक्कम सायबर पोलीस स्टेशन, बीड यांनी तांत्रीक पध्दतीने तपास करुन परत मिळवली १) अर्जदार नामे प्रमोद रामराजे राउत रा. चिंचोली (माळी) ता. फेज जि.चीड यांनी सायबर पोलीस ठाणे, बीड येथे आर्ज दिला की, दिनांक ०१/०७/२०४ रोजी माझ्या महाराष्ट्र ग्रामीण बैंक खाते क्रमांक ८००४००८३००७ यामधुन ५०,०००/- रुपयाचे व खाते क्रमांक ५४५०८००७०२२ या खात्यामधुन २०,०००/- असे एकुन ७०,०००/- रुपयाचा आनलाईन फ्रॉड झाला आहे. वगैरे मजकुरचा अर्ज चौकशी कामी आमचेकडे प्राप्त झाला आहे तक्रारदार श्री प्रमोद रामराजे राउत यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सायबर पोलीस स्टेशन बीड येथील पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांनी तंत्रीक पध्दतीने तपास करुन सदरची गेलली रक्कम ७०,०००/-रुपये होल्ड केले आहेत. तक्रारदार यांनी सदर आर्जावरुन पोलीस ठाणे केज येथे गुरन ४३४/२०२४ कलम ३१८(४) भा.न्या. सं सह कलम ६६ (ऊ) माहीती तंज्ञान अधीनीयम प्रमाणे दिनांक ०७/०८/२०२४ गुन्हा दखल आहे.

तक्रारदार श्री प्रमोद रामराजे राउत रा. चिंचोली (माळी) ता. केज जि.बीड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सायवर पोलीस स्टेशन, बीड येथील पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांनी तांत्रीक पध्दतीने तपास करुन तक्रारदार यांची ऑनलाईने पध्दतीने फसवणुक करुन घेतलेले एकुण ७०,०००/- रक्कम ही मा. कोर्टाचे अदेशन्वेय तक्रारदार यांचे खातेमध्ये परत मिळवून दिली आहे.

२) अर्जदार नामे शैलेश राधेशाम मुंदडा रा.बोड ता.जि.बीड यांनी सायबर पोलीस ठाणे, बीड येथे दिनांक ०८/११/२०२४ रोजी रोजी तक्रार आर्ज दिला की, दिनांक १५/१०/२०४ रोजी माझे -दखड इ-छ्घ खाते क्रमांक ९१५०१००४३४२९०१७ यामधुन विर्वता स्टेट ऐजेन्सी घजढ-घ च-कए छऊठ- इ-छ्घ -उउजणछढ छज-१२४९३४३४१५ चावर २०,०००/- व दिनांक १६/१०/२०२४ रोजी ३०,०००/- १२,६००/- रुपयाचे विला बुक करणेसाठी असे एकुन ६२,६००/-रुपये अॅडहंन्स जमा केले सदर विबंता स्टेट या वेपसाईट कडुन एसएमएस आला की तुमची बुकींग फैन्सल केली आहे तुमचे पैसे परत करतो असे खोटे बायदे देवू लागले परंतु पैसे परत दिले नाही तसेच बंगवेगळे कारणे सांगून टाळाटाळ करत आहे.

तक्रारदार श्री शैलेश राधेशाम मुंदडा रा.वीड ता. जि.बीड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सायबर पोलीस स्टेशन, बीड येथील पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांनी तांत्रीक पध्दतीने तपास करुन तक्रारदार यांची फसवणुक इशालेली रक्कम ६२,६००/- रक्कम ही तात्काळ तक्रारदार यांचे खातेमध्ये परत मिळवुन दिली आहे.

सदर कामगीरी मा. पोलीस अधीक्षक बीड सो, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास गात, पोलस निरीक्षक एस.ए घोडके, आर.जि. कासले पोउपनि, पो. ह. भारत जायभाये, बप्पासाहेब दराडे, पंचम वडमारे, अनिल डोंगरे, गिरी, पोलीस अमलदार विजय घोडके, श्रीकांत बारगजे मस्के, दरेकर, उगलमुगले, जाधव, प्रदिपकुमार वायभट, व महीला पोलीस अंमलदार सुनिता शिंदे, शुभांगी खरात काशीद, औसरमल, सर्व सायबर पोलीस स्टेशन बीड यांनी केली आहे.

सर्व नागरीकांनी ऑनलाईन पध्दतीने आर्थिक व्यवहार करताना, आलेले फोन, डचड, ची खात्री करुनच व्यवहार करावा असे सायबर पोलीस स्टेशन, बीड तर्फे आवाहान करण्यात येत आहे. सायबर क्राईम ब्रँच बीड पोलीस स्टेशन तर्फे जनतेचे हिताचे निर्णय घेतले जात आहेत सायबर यांची कर्मचारी यांनी जनतेची ऑनलाइन पसरून झाल्यानंतर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे पुन्हा एकदा सायबर पोलीस क्राईम ब्रँच व बीड जिल्हा पोलीस यांचे जनतेतून होत आहे





## ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये सावित्री च्या लेकी कार्यक्रमाचे आयोजन

माजलगाव:- येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रमुख मार्गदर्शक प्रा.स्नेहल पाठक, अर्चना ताई कचरे, सीमा नाईकनवरे, आर्टिस्ट शीतल मालानी, शाळेचे सर्व माता पालक,विद्यार्थी उपस्थित होते.. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रिन्सिपल अमृता मॅडम यांनी महिलांना विचार ऐकण्यासाठी व मांडण्यासाठी व्यक्त होण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे..शाळेच्या महिला पालकांनी मनोगत मांडले त्यामध्ये ऑनेस्टी शाळेत नेहमीच सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे शाळेला सुट्टी न देता विद्यार्थ्यां समवेत भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हे उल्लेखनीय आहे व समाधान व्यक्त केले..

महिला पालक प्रतिनिधी म्हणुन शेख इरफाना शेख मकसूद यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मानीत करण्यात आले..अर्चना ताई कचरे यांनी महिलांना खंबीरपणे जगण्यासाठी अनमोल मार्गदर्शन केले व सर्वच महापुरुषांचे विचार आचरणात आणावे व सहभागी व्हावे असे सूचित केले..शीतल मालानी यांनी महिलांना स्वावलंबी व्हाव्यात यासाठी मार्गदर्शन केले...कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया गरुड यांनी केले...सर्व पाहुण्यांचा कार्य परिचय शाळेचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल वाघ यांनी दिला. श्रुती कुलकर्णी यांनी आम्ही सावित्रीबाई च्या लेकी यावर संगीतमय कविता सादर केली...पाहुण्यांचे आभार प्रदर्शन सुशीला जोशी यांनी केले..कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ मॅडम, ठोसरे ताई, टाक ताई यांनी मेहेनत घेतली...

# पांगरबावडी येथील मसनजोगी वस्तीत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

बीड (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील पांगरबावडी येथे धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने मसणजोगी वस्ती येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली .

भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज, ३ जानेवारी जयंतीदिन. स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्रीबाईंना त्यांच्या १९२ व्या जयंती दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले व सर्वांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे कठीण कार्य ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी केले. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील बुधवार



पेठेत मुलींची पहिली शाळा काढून या दाम्पत्याने प्रथम शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. काही धर्ममार्तंडांनी 'धर्म बुडाला' अशी ओरड केली व सावित्रीबाईंवर धर्मबुडवी म्हणून ते शेणमाती, दगड फेकू लागले. तरीसुद्धा त्या मागे हटल्या नाहीत. अस्पृश्यांना शिकविल्यामुळे सनातनी मंडळी जास्तच चिडली. त्यांनी ज्योतिरावांच्या वडिलांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे ज्योतिरावांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी सावित्रीबाई फुले यांना घराबाहेर पडणे भाग पडले. अशाही परिस्थितीत सावित्री मुळीच डगमगली नाही. ज्योतिरावांच्या कार्यात त्यांनी पूर्णपणे साथ देण्याची तयारी केली होती. सावित्रीबाई फुले अशिक्षीत होत्या. त्यांना ज्योतिराव फुले यांनी घरी शिकविले व नंतर शाळेत शिक्षण देण्याचे कार्य सावित्रीबाईंनी केले. अशी चर्चा आज जयंती दिनानिमित्त भटक्या जमातीतील मसनजोगी समाजातील महिलांसोबत करण्यात आली व आपला पाल्यांना लेकरांना शिकवा अशी चर्चा करण्यात आली.

धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड चे प्रकल्प समन्वयक प्रियंका खोब्रागडे, संस्था फेलो अशोक गायकवाड, लक्ष्मी संकोड, अनेक महिला व मुल तसेच मुली उपस्थित होते.



## आर. के कंपनी चे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मा. रुद्रा Rudra Kasar भैया कासार यांचा अभिष्टचिंतन सोहळा

माजलगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष आणि जनमतातले कायमचे नगराध्यक्ष आदरणीय सहाल भैया चौऊस व भारतीय कॉंग्रेसचे नेते दत्ता भाऊ कांबळे यांची प्रमुख उपस्थिती.नगरसेवक शरद यादव, श्री अशोक भाऊ कांबळे,नगरसेवक इम्रान पटेल, युवकांचे नेते विवेक पोटभरे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल भाऊ तुपसौंदर, युवा नेते सचिन भाऊ जावळे,युवा नेते गणेश रांजवन, युवा नेते सचिन कांबळे सह प्रचंड युवकांची गर्दी.यावेळी मित्रपरिवार यांनी भावी नगरसेवक म्हणून शुभेच्छा दिल्या.

# युबा शक्ती आग्रौ प्रोड्युसर कंपनी याच्या मार्फत शेती गट व नैसर्गिक शेती मिशन योजनेअंतर्गत मोजे. आचार्य टाकळी येथे शेतकऱ्यांना ड्रम चे वाटप

## डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेने अंतर्गत मोजे आचार्य टाकळी येथे गाव पातळीवरील प्रशिक्षण गटास ड्रम वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला

सिरसाळा / प्रतिनिधी.( बापु किरवले)

आज दिनांक २ रोजी सकाळी ११.३० वाजता शेतीमध्ये सतत त्यांनी होत असलेल्या रसायनाचा अतिरिक्त वापर यामुळे जमिनीचा पोत घालवलेला आहे. त्यामुळे जमिनीचा पोट बिघडून जमिनी नापीक होत चालले आहेत.रासायनिक किडनाशके/ औषधांच्या वापरामुळे जमीन व पाणी दूषित होत आहे.एकूणच शाश्वत कृषी उत्पादनांसाठी नैसर्गिक/ सेंद्रिय शेती हा पर्याय आहे.या दृष्टीने राज्यात नैसर्गिक/ सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याकरिता डॉ .पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन योजनेला सन २०२२_२३ ते सन २०२७२८ या कालावधी करिता मुदत वाढ देऊन मिशनची व्याप्ती राज्यभर वाढविण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.मिशनच्या नावात बदल करून डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती विषय असे नामकरण करण्यात आलेली आहे.याच उपक्रमांतर्गत मौजे आचार्य टाकळी यथे गाव पातळीवरील प्रशिक्षण गटास ड्रम वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमाला गावच्या युवाशक्ती अग्रो प्रोडक्टसर कंपनी आचार्य टाकळी यांनी बनवलेल्या शेती गटांचे सदस्य व प्रकल्प व परळी तालुका कृषी अधिकारी रवी मुंडे साहेब. कृषी प्रर्यवेक्षक सौ.नागरगोजे मॅंडम. कृषी सहाय्यक.सौ.हडबे मॅडम.



तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सौ.फड मॅंडम.सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक बिडगर सर.व युवा शक्ती कंपनी चे अध्यक्ष. अमर भैया घोडके. व महादेव आबा आचार्य. आक्षय भैया आचार्य. बाबासाहेब किरवले. अनिल आचार्य. पडीत आणा आचार्य. बजु भैया घोडके. दामोदर कोरडे.मधुकर किरवले बाळु झगडे बालासाहेब गायकवाड गणेश सातपुते बाळासाहेब काकडे भागवत काकडे.राजेभाऊ आचार्य. आशोक झगडे. पडीत किरवले.व कंपनीचा कर्मचारी शहाणे. व सर्व शेतकऱ्यांना ड्रम वाटप करण्यात आले.व सर्व सदस्य व गावातील मंडळी उपस्थित होती.

शेतकऱ्यांनी सेंद्रिय निविषठा तयार करण्यासाठी ५० आर.क्षेत्र असलेले गट तयार केले असुन त्या गटाला ड्रम वाटप करण्यात आले.माननीय प्रकल्प संचालक आत्मा याच्या मार्गदर्शन खाली. व तालुका क्रषि अधिकारी परळी याच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

शेतकऱ्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे,डां.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनच्या माध्यमातून नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर थांबवून जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवून जमिनीची सुपिकता व आरोग्य सुधारणे. रसायनमुम्रकत सुरक्षित सकस व पोषणमुक्त नैसर्गिक व सेंद्रिय शेतमाल उत्पादित करणे.नैसर्गिक व सेंद्रिय शेतमालाची मुल्यसाखळी विकासित करणे.नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे हा उपक्रम येत आहे.शाश्वत कृषी उत्पादनासाठी नैसर्गिक/ सेंद्रिय शेती करावी.सातत्याने होत असलेल्या रसायनांचा अतिरिक्त वापरा मुळे जमिनीचा पोत बिघडून जमिनी नापीक होत चालल्या आहेत. रासायनिक किडनाशके/औषधांच्या वापरामुळे जमीन व पाणी दूषित होत आहे.एकूणच शाश्वत क्रषि उत्पादनासाठी नैसर्गिक/सेंद्रिय शेतीस हा पर्याय आहे.असे तालुका क्रषि अधिकारी परळी. रवी मुंडे साहेब यांनी शेतकऱ्यांना सूत्रसंचालन केले आहे.

## योगेश्वरी पतसंस्थेतर्फे प्रजासत्ताक महोत्सवाचे आयोजन

अंबाजोगाई - योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई, योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार पतसंस्था अंबाजोगाई आणि छात्रसेना अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रजासत्ताक महोत्सवाचे आयोजन योगेश्वरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यासाठी करण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांसाठी प्रजासत्ताक दिनी समूह नृत्य स्पर्धा तर कर्मचार्यांसाठी कै. कमलाकर पसारकर स्मृती क्रिकेट स्पर्धा, स्वातंत्र्यसेनानी कै. लक्ष्मणराव जोशी बॅडमिंटन स्पर्धा, स्वातंत्र्यसेनानी कै. वामनराव ठाकूर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि महिला कर्मचाऱ्यांसाठी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या प्रजासत्ताक महोत्सवाच्या स्पर्धांचे उद्घाटक योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रशेखर बर्दापूरकर राहणार आहेत याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी आणि संचालक उपस्थित राहणार आहेत.

दरवर्षी या स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडत असतात आणि विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या उत्साहामध्ये भर टाकत असतात अशी माहिती योगेश्वरी पतसंस्थेचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी दिली.

# गेवराईतील कृषी प्रदर्शनाचा लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यानी घ्यावा - संयोजक महेश बेदरे

## खा.रजनीताई पाटील, जरांगे पाटील, महंत शिवाजी महाराजांच्या हस्ते कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : मराठवाड्यातील शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १६ वर्षापासून किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने कृषिरत्न गणेशराव बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दि.०३ ते ०७ जानेवारी २०२५ दरम्यान गेवराई येथील बीड रोड वरील ८ एकर दसरा मैदानात हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवारी दि.०३ रोजी दुपारी एक वाजता अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन सोहळा संपन्न झाले असून या उद्घाटन सोहळ्यास बहुसंख्येने मान्यवर उपस्थित होते. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान वतीने कृषिरत्न गणेश बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ




राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी यांचा यात विशेष सहभाग राहणार आहे. या कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालना तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहावयास मिळणार आहेत. शुक्रवार दि.०३ जानेवारी २०२५ रोजी कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन सोहळा समारंभ राज्य सभेच्या खासदार सौ. रजनीताई अशोकराव पाटील, मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी आदी उपस्थित होते. यावेळी गेवराचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, राष्ट्रवादीचे नेते राजेसाहेब देशमुख, गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे, पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर, तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कृषी प्रदर्शनाचे मुख्य संयोजक महेश बेदरे यांनी केले होते.

## धारुरमध्ये मस्साजोग प्रकरणी देशमुख कुटूंबाला न्याय मिळण्यासाठी कन्डल मार्च

धारूर / प्रतिनिधि

मस्साजोग येथील सरपंच स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांची निर्घुण हत्या करणाऱ्या आरोपींना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा देऊन त्यांच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा यासाठी शहरात दि.३ शुक्रवार रोजी कन्डल मार्च काढण्यात आला. यात शेकडो तरुणांसह मुला मुलींनी सहभाग घेतला.

धारूर शहरामध्ये दि. ३ शुक्रवार रोजी सायंकाळी ६ वाजता कॅन्डल मार्च आयोजित करण्यात आला. यात मोठ्या संख्येने तरुणांनी सहभागी नोंदवुन सरकारचा निषेध केला. धारेश्वर मंदिर येथून कॅण्डल मार्चला सुरुवात होऊन काशिनाथ चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्वर्गीय संतोष आण्णा देशमुख यांना आदरांजली वाहण्यात आली. कै.संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी घोषणा देण्यात आल्या सरपंच स्वर्गीय संतोष




अण्णा देशमुख यांची निर्घुण हत्या करणाऱ्या आरोपींना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा देऊन त्यांच्या कुटुंबीयांना न्याय दयावा अशी मागणी करण्यात आली यावेळी मोठया संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते.





## माजलगाव शहरातील इमानदारी व गंगा जमुनी तहजीब व भाईचाराची मिसाल कायमच

माजलगाव /प्रतिनिधी

सय्यद अमीन सय्यद हुसेन राहणार मोगल मोहल्ला तालुका माजलगाव जिल्हा बीड यातले रहिवासी असून बरेच वर्षापासून इमानदारी व ऐतिबारा ने ऑटो रिक्षा चालवीत आहे त्यांचे इमानदारीचा खरंतर जितका कौतुक केले पाहिजे तितका कमीच आहे कारण माजलगाव पंचायत समितीमध्ये कार्यरत असणारे सरकारी कर्मचारी एका ऑटो रिक्षा मध्ये प्रवास करत असताना त्या ऑटो रिक्षा मध्ये ३० ते ३५ रक्कम हजार रुपयाचा मोबाईल सय्यद अमीन सय्यद हुसेन त्यांचे आटो मध्ये विसरून किंवा घाई गडबडीत ऑटो रिक्षा मध्ये मोबाईल पडले होते त्यानंतर ऑटोही निघून गेला व मॅडम पण निघून गेले त्यानंतर काही वेळा नंतर मोबाईल ऑटो वाले सय्यद अमीन सय्यद हुसेन यांना मोबाईल ऑटो रिक्षा मध्ये सापडले व पुन्हा एकदा ते गरीब इमानदार ऑटो रिक्षावाल्यांनी माजलगाव मध्ये इमानदारीची मिसाल कायम केली त्यांची सर्व नागरिक मध्ये चर्चा व सन्मान होत आहे

# आष्टी तालुक्यातील तलाठी कार्यालय बनले शोभेच्या वस्तू

## सज्ञा सोडून कडा- धानोरा- आष्टी येथे तलाठी यांच्या खाजगीचाळी

**आष्टी /प्रतिनिधी**

**तालुक्यातील तलाठी सज्जा सोडून आपल्या सोयीनुसार कार्यालय थाटले आहेत याशिवाय आष्टी शहरात खाजगी कार्यालय थाटून बेकायदेशीर वसुलीसाठी खाजगी व्यक्तीची नेमणूक करून तलाठ्याच्या पश्यात हीच खाजगी लोक काम पाहतात काही कागदावर सह्या करून ठेवलेले असतात मग हे तलाठी महशय आठवड्यातून एकदा आपल्या सज्जावर वारीला येतात**

शासनाने खर्च करून प्रत्येक कार्यालय दिले आहे परंतु हे कार्यालयात शोभेच्या वस्तू बनत चालली आहे आणि शेतकऱ्यांना किरकोळ कामासाठी शहरातील गल्लीबोळातून तलाठी कार्यालय शोधावी लागते ह सर्व होत असताना वरिष्ठ अधिकारी यांना पाठीशी तर घालत नाहीत ना असा प्रश्न नागरिकात निर्माण होत आहे आष्टी तालुक्यातील अनेक तलाठी सज्जावर राहत नाहीत शासनाने बांधून दिलेल्या तलाठी कार्यालय भूत बंगले बनले आहेत तलाठी सज्जा कार्यालयात एखाद्या कामासाठी नागरिक गेल्यावर साहेब कधी येणार आहेत आमचा अर्जंट काम होतं येतील का असे विचारू लागते मग खाजगी नेमलेले लोक उडवून ची उत्तरे देत आज नाहीत साहेब उद्या येतील असे उत्तरे देत मोकळे होतात परंतु नागरिकांना मात्र याचा मोठा मनस्ताप करावा लागतो राज्य सरकारने अनुशासनाच्या सोयीसाठी ग्रामीण भागासाठी सुयोग व्यवस्था केली असून तलाठी हा व्यवस्थेचा दुवा मानला जातो पूर्वीच्या काळात तलाठी ची नेमणूक जिल्हाधिकारी करत असत त्यामुळे ग्रामीण भागातील काम करणारा तलाठी असतो त्याची नाळ ग्रामीण जीवनाशी जोडलेली असते लोकांना फेरफार, चतुर :सीमा ,उतारे , वेळेला भेटत नाहीत त्याला त्यांनी खाजगी लोकांना ठेवल्याने या कागदावर तलाठ्याची सही लागते त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान विमा सारख्या गोष्टी पासून वंचित राहावे लागते लोकाच्या शेतात काबाडकष्ट करणार शेतकरी रोजंदारी बुडवून तलाठी यांच्याकडे जातो पण तेच उपलब्ध नसतात काही तर सज्जा वर तर तलाठी दाखवा बक्षीस मिळवा अशी परिस्थिती पाहायला मिळते

# सिरसाळा येथे दहशत व गुंडाराज करण्यासाठी व्यक्तीने हातात तलवार घेऊन बाजार तळावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

## सिरसाळा पोलीसाची धाडसी कारवाई अवघ्या काही मिनिटात आरोपीच्या आवळल्या मुस्क्या



सिरसाळा प्रतिनिधी.दिनांक!१ .बुधवार रोजी घडली घटनां

पोलिस स्टेशन सिरसाळा यथे गुरन०२ड२०२५कलम १३२.११५ (२).३५२ .३५१(२).३ (५)भा.न्या.संहिता २०२३सह कलम.४ड२५भा हत्यार कायदा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी आशिष रमाकांत शेगुळे वय ३९ वर्षे व्यवसाय पोलीस हवलदार.ब.न.२४४ नेमणूक पोलीस ठाणे सिरसाळा.आरोपी क्र. १) विशाल लक्ष्मण आरगडे.क्र.२) अनिल परमेश्वर गायकवाड..दोन्ही रा.सिरसाळा ता.परळी वै.जि. बीड. गु.घ.ता.वेळ ठिकाणदिनांक. १.१.२०२५.रोजी १४.३० वाजताचे सुमारास बाजार तळावरील देशी दारू दुकानांवर सिरसाळा येथे. खुलासा वरील तारीख वेळी ठिकाणी यातील फिर्यादी हे बाजारतळ सिरसाळा येथील देशी दारू दुकानाच्या जवळ असताना आरोपी नामे. विशाल लक्ष्मण आरगडे. याने हातात लोखंडी तलवार घेऊन त्यांच्यासोबत असलेला. अनिल परमेश्वर गायकवाड. दोन्ही रा. सिरसाळा यांचे सोबतीचे सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करून भांडण करीत असताना आम्ही त्यांना प्रतिबंध व आटकाव करीत असताना फिर्यादी व साक्षीदार यांना लाथा बुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

व हातातील तलवार घेऊन फिर्यादी व साक्षीदार याच्या अंगावर धावून येऊन फिर्यादीचे पोलीस गणवेशाची कॉलर पकडून समोरील दोन बटन तोडून शासकीय कामात अडथळा व असे कित्येक किरकोळ दुखापत करणे धमक्या देणे भर चौकात हातात लोखंडी तलवार घेऊन दहशत निर्माण करणे यासारखे व शासकीय कामात अडथळा आणणे असे सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. निर्माण केला म्हणून वर नमूद कलमाप्रमाणे दखलपात्र गुन्हा दाखल करून पुढील तपास सिरसाळा पोलीस स्टेशन चे सपोनि.गोरखनाथ दहिफळे साहेब करीत आहेत.



नगर दक्षिणचे खासदार मा.निलेशजी लंके साहेब व मा.प्रताप(काका)ढाकणे यांनी आज आमच्या येथे सांत्वन भेट दिली व खेडकर परिवाराच्या दु:खात सहभागी झाले

# पोलिस अधीक्षक बीड नवनित कावत साहेबांना खुले पत्र

पोलिस अधीक्षक साहेब

पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करा खंडणीखोरांवर कारवाई कराच पण पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण?? त्यांच्या अडचणींसाठी साठी कोणता नंबर देताय???....

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

सस्नेह नमस्कार ...खुले पत्र लिहिण्यास कारण की काल दि.२ जानेवारी रोजी आपण सौर व पवन ऊर्जा प्रकल्प आधिका-यांची बैठक घेतली आणि दलाल खंडणीखोरांना घाबरू नका गावगुंड खंडणी मागत असतील तर जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार करा; स्थानिक पोलीसांचे नंबर ठेवून माहिति द्यावी.आणि संकटसमयी ११२ नंबर ला फोन करावा... आपण घेतलेल्या या निर्णयाचे आपले मनापासून अभिनंदन आणि विशेष कौतुक..... परंतु मला आक्षेप आहे आपण पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांचे ऐकुन शेतकरी काम अडवतात,त्रास देतात, जमिन अधिग्रहणचे वाढीव दर मागतात याबद्दल बोललात म्हणून.... पोलिस अधीक्षक साहेब मी आपणास खुले आवाहन करत आहे बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहणाच्या कागदपत्रांची तपासणी एकदा कराच. आणि महसूल प्रशासनाने काय काळाबाजार केला आहे तो आपल्या लक्षात येईल आणि पवनचक्की कंपन्या किती धुतल्या तांदळासारखे आहेत आणि शेतकऱ्यांची कशी आर्थिक फसवणूक केली ते लक्षात येईल.... काही उदाहरणे सांगतोय



अ ) बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील लोकवस्ती मधील पवनचक्की जिल्हाधिका-यांनी काम बंद करण्याचे आदेश देऊनही का सुरू आहे??

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील लोकवस्ती मध्ये उभारण्यात आलेल्या पवनचक्की विरोधात स्थानिक वसाहतीतील ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी बैठक घेऊन आढावा घेऊन पवनचक्कीचे काम बंद करण्याचे आदेश दिले होते मात्र तरीही जिल्हाधिकारी यांचे आदेश डावलून लोकवसाहतीत पवनचक्की दिमाखात उभी आहे . गेवराई तालुक्यातील पालख्या डोंगरावरील पवनचक्की कोसळण्याच्या घटनेनंतर या ग्रामस्थांमध्ये दहशत आहे.. पोलिस अधीक्षक साहेब आपण न्याय द्याल काय??

आ) पवनचक्की कंपन्यांच्या जमिन अधिग्रहणाची कागदपत्रे तपासून पहा

बीड तालुक्यातील महाजनवाडी शिवारात गट नंबर ४९६,४९७,४२१ व ५०१ मध्ये वडीलोपार्जित समाईक असलेली जमीन कुटुंबातील ६ व्यक्तींच्या नावावर असुन या समाईक क्षेत्राचे महसूल अभिलेखात ७/१२ पत्रकावर शेतजमीनीचे वाटप झालेले नसतानाही पवनचक्की कंपन्यांनी जमिनीच्या ६ मालकापैकी केवळ २ जणांच्या संमतीने ६ एकर जमीन दुय्यम निबंधक जिल्हा कार्यालय बीड येथे कशी नोंदवुन घेतली याविषयी जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार करून ६ महिने उलटूनही कोणतीही कारवाई नाही. याचप्रमाणे कोणाच्याही जमिनी आणि कोणाच्याही अडाणी शेतकऱ्यांकडुन इंग्रजीत असलेल्या कागदापत्रावर सह्या आहेत.तपासुन पहाच एकदा मग कळेल पवनचक्की कंपन्या किती साळसुद आहेत.

इ). शेतकऱ्यांना पवनचक्की कंपन्यांनी बाउंन्स चेक देणं हि फसवणूक नाही??

बीड तालुक्यातील कानडीघाट येथील शेतकऱ्यांना पवनचक्की कंपन्यांनी दिलेले चेक बाउंन्स झाले.सुभाष रामभाऊ झोडगे यांना ६ लाख रूपयांचा धनादेश दि.१० जुन २०२४ रोजी दिला.सुभाष यांचे वडील रामभाऊ बार्शी येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आल्यानंतर पैसे काढण्यासाठी धनादेश बँकेत जमा केला असता तो वटलाच नाही. या गावातील ब-यांच लोकांच्या बाबतीत हि घटना घडली शेवटी शेतकरी आक्रमक झाले. तरीही पोलिस फौजफाटा घेऊन त्यांना दाबण्याचा प्रयत्न झाला परंतु प्रसारमाध्यमांनी बातमी लाऊन धरल्यानंतर त्यांना कंपनीने पैसे दिले.. हि फसवणूक पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांनी का केली तेवढं जमलं तर विचारा साहेब...

ई ) शासकीय जमिनीवर पवनचक्की उपकेंद्र बांधले ; गुन्हे दाखल करण्याचे आदेश देऊनही आपले पोलिस प्रशासन गुन्हे का दाखल करत नाही??? तेवढं बघा साहेब

पाटोदा तालुक्यातील धनगरजवळका गाव तलाव क्रमांक ७ भुसंपादीत जमिनीवर रेन्यु एम. एच. लि.कंपनीने पावर स्टेशन बांधले.सदर कंपनीवर गुन्हे दाखल करण्याबाबत कार्यवाहीचे पत्र उप विभागीय जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद उपविभागाने १९ जुन २०२४ रोजी पाटोदा पोलिसांना दिले होते.मात्र अजुनही आपल्या कर्तव्यदक्ष पोलिस प्रशासनाने गुन्हा दाखल का केला नाही याची माहिती घ्यावी हि नम्र विनंती.... तुर्तास ईथंच थांबतो साहेब... खंडणीखोरांवर कारवाई कराच पण शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देऊ नका.. पवनचक्की कंपन्यांचे पाठिराखे व्हा.पण शेतकऱ्यांना वाली कोण साहेब?? त्यांच्या साठी एखाद्या नंबर सार्वजनिक करा साहेब....

# शिवराज्य वाहन खरेदी व विक्री संघाचा. चौथा वर्धापन दिनमोठ्या उत्साहात०२/१/२०२५/ रोजी संपन्न



बीड (प्रतिनिधि)

शिवराज्य वाहन- खरेदी व विक्री संघाचा चौथा- वर्धापन दिन खरेदी व विक्री क्षेत्रातल्या एजंट व डीलर यांना सभासद यांच्या समस्यांचे नोंदनीकरण करून , ळऊव नियुक्तीपत्र देऊन तसेच मान्यवरांच्या उपसथितीत केक कापून मोठ्या उत्साहात-साजरा करण्यात आला- यावेळी संघाचे मार्गदर्शक लोकप्रिय नगरसेवक योगेश बापू ससाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रम सोहळ्यात हडपसर पंचक्रोशीतील. राजकीय सामाजिक शैक्षणिक व डॉक्टर वकील- इंजिनियर - ग्राहक डीलर्स व एजंट यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची- शोभा वाढवली.आपल्या प्रस्ताविक भाषणात लोकप्रिय नगरसेवक योगेश -बापू ससाने यांनी-संघटनेचे भरभरून कौतुक केले. भविष्यात ही संघटना संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक करेल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला यावेळी. संघटनेचे संस्थापक खजिनदार. रमजान भाई शेख. यांनी त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

प्रसिद्ध - ॲडव्होकेट- पवन राजे डोईफोडे जिल्हा -न्यायालय पुणे. यांनी आपल्या हृदयस्पर्शी भाषणात शिवराज्य, या नावाला शिवराय यांच्या विचारांची- जोड़ नक्कीच असेल व आयुब भाई पठाण या नावाचा व्यक्ती. महाराष्ट्राचे आराध्य. दैवत छत्रपती शिवाजी महाराज. यांच्या नावाने संघटना चालवतात. यांचा आदर्श संपूर्ण महाराष्ट्राने.घ्यावा.

ग्राहक व डिलर यांच्या. मधील दुवा म्हणुन आपले कार्य कराल, ही, सदीच्छा त्यांनी व्यक्त केली यावेळी. स्वीकृत नगरसेवक अविनाश तात्या काळे. प्रवीण भाऊ तुपे (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार स्वीकृत नगरसेवक संजय- तात्या शिंदे शिवसेना नेते महेंद्र- तात्या बनकर (प्रहार ) जनशक्ती.पक्षाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष. दत्ताभाऊ मस्के. अजित भाऊ कुलकर्णी प्रहार,कार्य अध्यक्ष खालीद भाई मणियार सामाजिक कार्यकर्ते सलीम बाबा सय्यद सामाजिक कार्यकर्त्या शमीम, पठाण,गणेश बोराटे विद्यार्थी वाहतूक संघटना पवन काळे. सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. सामाजिक कार्यकर्ते जाकिर मुजावर धीरज तरडे. अन्वर इनामदार, संघटनेचे. कार्याध्यक्ष, खलील भाई पठाण, सचिव अझहर मणियार. शफिक पठाण जय वाणी.विशेष - करून संस्थापक अध्यक्ष आयुब भाई पठाण यांचे मित्र.चित्रपट अभिनेते दृश्यम- फेम कमलेश -सावंत सरांचे मनपूर्वक. अभिनंदन त्यांनीही संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त भरभरून शुभेच्छा दिल्या.



श्री माऊली इंग्लिश स्कूल सांडरवन येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

# लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

केज /प्रतिनीधी

केज येथील लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज मध्ये शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. केज येथील सिध्दीविनायक शैक्षणिक सेवाभावी संस्था बीड संचलित,लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज मध्ये शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले संस्थापक रमाकांत (बापू) मुंडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. या वेळी प्रमुख पाहुणे रमाकांत (बापू) मुंडे यांनी सावित्रीबाई फुले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्या विषयी विद्यार्थ्यांशी हितगुज सांगताना




म्हणाले की, त्या काळात स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून अंगावर शेण आणि चिखल झेलून स्त्री शिक्षण सुरू ठेवले. खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या शिक्षणासाठी अपार कष्ट आणि अपमान सहन करूनही त्या आपल्या कर्तव्यापासून मागे हटल्या नाहीत किंवा नाउमेद झाल्या नाहीत. म्हणून स्त्रीयांच्या उद्धारकर्त्या या सावित्रीबाई फुले याच आहेत. त्यांच्यामुळेच आज विविध क्षेत्रात स्त्रिया उत्तुंग झेप घेत आहेत. खऱ्या अर्थाने त्यांनी महिलांना शिक्षित करून त्यांना गुलामीतून बाहेर काढले. अशी माहिती त्यांनी दिली.

# भारतीय बौद्ध महासभा केजच्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**केज (प्रतिनिधी)- भारतीय बौद्ध महासभा केज च्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते लिंबराज बापु गायकवाड बालासाहेब जोगदंड,बापूसाहेब गायकवाड,सोनू गायकवाड, बळीराम सोनवणे, रंजीत घाडगे,आश्रुबा खरात यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.**

यावेळी बोलताना मान्यवर म्हणाले की, भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले यांची ओळख त्यांनी त्याकाळी असंख्य अडचणींना तोंड देत शिक्षणासारखे पवित्र कार्य केल्यामुळे निर्माण झाली.

पुढे चालून भारत सरकारने त्यांच्या नावाने टपाल तिकीट काढून तसेच विद्यापीठाला त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा पाया निर्माण केला आहे आता फक्त आपल्याला त्यांच्या विचारावर चालून देश शिक्षणाच्या बाबतीत आणखीन मजबूत करावयाचा असून समाजातील प्रत्येक स्त्री ने केजी टू पीजी शिक्षण घेतल्याशिवाय आणि प्रगल्भ झाल्याशिवाय स्थिर बसू नये असे आव्हान मान्यवरांनी यावेळी कार्यक्रमा दरम्यान केले.भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा केज येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रसंगी बालासाहेब जोगदंड,बापूसाहेब गायकवाड,सोनू गायकवाड, बळीराम सोनवणे, रंजीत घाडगे उपस्थित होते.कार्यक्रमाला असंख्य बंधू बांधवांची भगिनींची उपस्थिती होती.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT